अर्जित रजेचे रोखीकरण सुधारीत वेतन
संरचनेनुसार करण्याबाबत .

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अरजा २००९/प्र.क्र.२१ / सेवा-६**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : २७ ऑगष्ट , २००९**

**वाचा :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा-२४०१/८/सेवा-९ दिनांक १५ जानेवारी ,२००१.

२) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दिनांक २२.४.२००९

**शासन निर्णय**

महाराष्ट्र नागरी सेवा ( रजा ) नियम,१९८१ मध्ये सेवानिवृत्तीच्या वेळी तसेच इतर विविध प्रकरणी अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची २४० दिवसांची मर्यादा ३०० दिवसांपर्यन्त वाढविण्याबाबत वरील शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी ,२००१ अन्वये आदेश काढले आहेत. राज्य शासनाने केंद्र शासनाच्या सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या आधारे दिनांक १ जानेवारी २००६ पासून राज्य शासकीय कर्मचा-यांना सुधारीत वेतन संरचना लागू केली आहे. या अनुषंगाने दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त / निधन झालेल्या/होणा-या शासकीय कर्मचा-यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाच्या परिगणनेसाठी सुधारीत वेतन संरचनेनुसार वेतन ग्राहय धरावे किंवा कसे , ही बाब शासनाच्या विचाराधिन होती . त्यास अनुसरून शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

०२. दिनांक १.१.२००६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त /शासन सेवेत असतांना मृत्यु झालेल्या / होणा-या तसेच वरील संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) व ३ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणी शासकीय कर्मचा-याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाच्या परिगणनेसाठी " वेतन" या संज्ञेचा अर्थ वरील संदर्भ क्र. २ अन्वये अंमलात आलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारीत वेतन ) नियम २००९ मधील नियम ३ (२) मध्ये दिलेल्या मूळ वेतनाच्या व्याख्येनुसार राहील.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २००९०८२७१८४४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( नमिता नं.पाटील )
शासनाचे उप सचिव

प्रति-

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, गोरेगाव, महाराष्ट्र, मुंबई (५० प्रती),

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, "बी" ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (१० प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (१० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रत्येकी ५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्रशिक्षण उप संचालक, (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर (१० प्रती),
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला, (१० प्रती),
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, (२५ प्रती),
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
बृहन्मुंबई महानगरपालिका, भविष्य निर्वाह निधी विभाग, प्रमुख लेखापाल यांचे कार्यालय,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, सेवा-६

* पत्राव्दारे

-------